नि.फौ.ख.क्र.३३८/२०१८
शासन–वि–प्रतिक
**नि.क्र. २३.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – अशोक केशव बंड,
वय – ५९ वर्षे, व्यवसाय – व्यापार,
राहणार– भाजीमंडई, दौंड, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. दि.२५.१०.२०१५ रोजी मी दौंड पोलीस स्टेशन येथे बोलावले होते. मी पोलीसांसोबत घटनास्थळी गेलो नाही. पोलीसांनी एका तयार केलेल्या पंचनाम्यावर सही करण्यास सांगितले. पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला असे काही घडले नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.क्र.२ वरील सही माझी आहे, परंतु त्यातील मजकुर मला माहिती नाही. फक्त सहीस **नि.२४** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास पाठिंबा देत नसल्याचे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नमुद केले व साक्षीदारास उलटतपासणी सदृष्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, पीएसआय एस. व्ही. हंकारे यांनी पंचनामा करण्यासाठी हुतात्मा चौक दौंड येथे बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी भीम वॉरीअर्स यांच्या कार्यक्रमात पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ धरम बनसोडे यांनी दाखविले आणि पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा लिहून, नकाशा काढुन, वाचुन त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. बी. म्हेत्रे यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/–

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
दिनांकः– १३.११.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.